**श्रेयस प्रेयस** **dt.4th April 26, 2010**

हजारो वर्षांपूर्वी पंचमहाभौतिक देहाच्या नाशानंतरही प्रगट होऊन येशू ख्रिस्ताने मृत्यूवर विजय मिळवला, तो आजचा दिवस, 'ईस्टर संडे.' तपसाधनेच्या काळात, चाळीस दिवसांच्या कठोर तपानंतर सैतानाने घेतलेल्या प्रश्नोत्तरांच्या परीक्षेत जेव्हा येशू उत्तीर्ण झाला, तेव्हा प्रसन्न होऊन सैतानाने त्याला सर्व प्रकारच्या सिद्धी देऊ केल्या होत्या असा बायबलमध्ये उल्लेख आहे.

येशू ख्रिस्ताच्या जन्माच्याही आधी, हिंदू अध्यात्माने दोन प्रकारचे जीवनमार्ग सांगितलेले आहेत; पहिला श्रेयस मार्ग आणि दुसरा प्रेयस मार्ग. (कठोपनिषद १.२.१) 'प्रेयस' म्हणजे मनुष्याला प्रिय असणाऱ्या भौतिक सुखांची प्राप्ती करण्याचं उद्दिष्ट ठेवून आचरलेला जीवनमार्ग, तर श्रेयस म्हणजे शाश्वत कल्याणाचं उद्दिष्ट ठेवुन स्वीकारलेला मार्ग. स्वत:चा जीवनमार्ग निवडण्याचं स्वातंत्र्य प्रत्येक मनुष्याला ईश्वराने दिलं आहे. बहुतांश वेळा सुखप्राप्तीचा मार्ग तत्क्षणी निवडला जातो कारण जीवनातली यच्चयावत सुखं प्राप्त झाली की मग आध्यात्मिक कल्याणाचं बघता येईल असा विचार मनुष्य करतो. कुठला मार्ग हिताचा हे ठरवण्यासाठी प्रथमत: मार्ग निवडीची निर्णय प्रक्रिया नेमकी कशी घडते याचं अवलोकन आवश्यक आहे.

मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार यांनी मिळून तयार होणाऱ्या मानवी देहातल्या उपकरणाला अंत:करण असं म्हणतात. हेच निर्णय प्रक्रियेचं प्रमुख केंद्र आहे. वास्तविक ही चारही एका अंत:करणाचीच उपांग आहेत, परंतु प्रत्येकाचं कार्यक्षेत्र निराळं असलयाने नाटकातल्या एकपात्री प्रयोगांमध्ये एकच कलाकार जशा निरनिराळ्या भूमिका पार पाडतो, तसंच जीवनातल्या 'निर्णयनाट्यात', अंत:करण नामक एकच कलाकार, विविध भूमिका पार पाडत असतं. पंचेंद्रियांच्या सहाय्याने बाह्य वातावरणातले विचार स्वीकारून, त्यांची भावनेसहित नोंद घेऊन, ते पुढे पाठवण्याचं 'आवक-जावक' कर्मचाऱ्यांचं कार्य मन करतं. 'चित्त, बुद्धी आणि अहंकार' हे वरिष्ठ अधिकारी या संदेशांचं पृथक्करण करतात आणि काय प्रतिक्रिया द्यायला हवी याचा निर्णय पुन्हा मनाला कळवतात. शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा आध्यात्मिक यांपैकी कोणत्या सुखांना मनुष्य अग्रक्रम देतो, यावर निर्णयाची प्रत अवलंबून असते.

श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी त्यांच्या 'विवेकचूडामणि' या ग्रंथात एकशेसाठाव्या श्लोकात, तीन प्रमुख प्रकारच्या मनुष्य स्वभावाचं उत्तम विश्लेषण केलं आहे.

देहोऽहमित्येव जडस्य बुद्धि:।
जड बुद्धी असणारा अज्ञानी मनुष, देहालाच 'मी' असं समजून देहसुखांनाच प्राधान्य देतो. परिणामत: निद्रा, आहार, मैथुनादी देहसुखांमध्ये आलेल्या किंचित न्यूनत्वाने सुद्धा तो अस्वस्थ होतो. देहाचा अपमान हा माझाच अपमान आहे असं गृहित धरून मानहानीसदृश भास निर्माण करणाऱ्या कुठल्याही घटनेवर ताबडतोब भावनात्मक प्रतिक्रिया तो देतो. या प्रतिक्रियेत मनाने घेतलेल्या निर्णयांचं प्राबल्य अधिक असतं तर चित्त आणि बुद्धीचा सल्ला घेतलाच जात नाही. या पद्धतीने घेतलेले निर्णय तत्कालिक परिस्थितीत बरोबर वाटले तरी ते अंतिम हिताचे ठरतातच असे नाही.
देहे च जीवे विदुषस्त्वहंथी:।।
या दुसऱ्या प्रकारच्या मनुष्याने थोडासा शास्त्राभ्यास केलेला असतो त्यामुळे देहाला 'मी' असं न मानता, देहातली मूळ चैतन्य शक्ती म्हणजे 'मी' आहे असं समजण्याच्या अवस्थेला तो पोहोचलेला असतो. परंतु आत्मज्ञान अजूनही झालेलं नसतं.
विवेकविज्ञानवतो महात्मनो।
ब्रह्माहमित्येव मति सदात्मनि।।
या सर्वश्रेष्ठ अवस्थेत, स्वत:च्या देहासकट भूतलावरील सर्व असार आहे आणि देहातलं मूळ चैतन्य म्हणजे 'मी' असून तेच साक्षात ईश्वर आहे, याचं खरं ज्ञान मनुष्याला झालेलं असतं. अशा अवस्थेतल्या मनुष्यामध्ये मन, बुद्धी, अहंकार, चित्त हे वेगवेगळे न राहता एकच अंत:करण तेवढं शिल्लक राहतं.
विवेकचूडामणि मध्ये वर्णन केलेल्या प्रथमावस्थेतून अंतिम अवस्थेपर्यंत जाण्याचा मार्ग म्हणजे श्रेयस मार्ग होय. श्रेयस मार्गावरची वाटचाल एकाएकी स्वीकारता येत नाही. त्यासाठी पारमार्थिक अनुभवांचे संस्कार सत्कर्माच्या माध्यमातून सातत्याने मनावर घडवणं आवश्यक असतं. तेव्हाच तत्कालिक सुखे नाकारून शाश्वत कल्याणाचे नचिकेत अथवा येशू ख्रिस्तासारखे असामान्य निर्णय घेण्याचं सामर्थ्य मनात निर्माण होतं.
'मी' आणि 'माझं' यामध्ये अडकलेला सामान्य मनुष्य असे असामान्य निर्णय घेऊच शकत नाही. आयुष्यभर प्रपंच, नातेवाईक, आप्त-स्वकियांमध्ये अडकलेल्या सामान्य मनुष्याला जेव्हा मृत्यूची चाहूल लागते तेव्हा मग भीतीपोटी तो ईश्वराचं आर्त स्मरण करू लागतो. या भीतीवर जर विजय मिळवायचा असेल

तर अंतिम क्षणी नव्हे, तर क्षणोक्षणी ईश्वराशी अनुसंधान साधता आलं पाहिजे. यासाठी, सतत सुखांच्या मागे धावपळ करत असताना किमान काही काळ तरी अंत:करणावर सत्कर्माचे सुसंस्कार घडविण्याचा निश्चय करणे, हा श्रेयस मार्गावरच्या वाटचालीचा प्राथमिक टप्पा आहे.

- बापट गुरुजी

bhende@indiatimes.com